॥ बहुजन हिताय । बहुजन सुखाय ॥

४२ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

# माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारुती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४३ वे नवीन वर्ष २३ वे | रविवार दि १ मार्च २०२६ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ९ वा

## नगरसेविका सौ. आशादेवी सोमेश यावलकर यांच्या संकल्पनेतून जागतिक महिला दिनानिमित्त सांगोल्यात महिलांसाठी मोफत प्रशिक्षण शिबिर








सांगोला : महिला सक्षमीकरणाच्या उद्देशाने प्रभाग क्र. ४ च्या नगरसेविका सौ. आशादेवी सोमेश यावलकर यांच्या संकल्पनेतून महिला दिनानिमित्त हे शिबिर रविवार, दि. १ मार्च २०२६ ते शनिवार, दि. ६ मार्च २०२६ या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत वज्राबाद पेठ, सांगोला येथ महिलांसाठी विविध कौशल्याधारित मोफत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या प्रशिक्षण शिबिरामध्ये महिलांसाठी बेसिक टेलरिंग, ॲडव्हान्स टेलरिंग, मेकअप, मेहंदी डिझाईन आदी कौशल्यांबरोबरच आयुष्यमान भारत कार्ड व ई- श्रम कार्ड संदर्भात मार्गदर्शन व नोंदणी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

. या उपक्रमाच्या माध्यमातून प्रभाग क्र. ४ मधील महिलांना स्वावलंबी बनविणे, त्यांना घरबसल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि शासनाच्या योजनांची माहिती पोहोचविणे हा उद्देश असल्याचे नगरसेविका सौ.आशाताई सोमेश यावलकर यांनी सांगितले.

इच्छुक महिलांनी दि. २८ फेब्रुवारी २०२६ पूर्वी नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. तरी सांगोला शहर व परिसरातील इच्छुक महिलांनी मोफत प्रशिक्षण शिबीराचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले असून अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी मो.८३९०६४१०६४ या क्रमांकाशी संपर्क साधावा.

## सांगोला शहरातील त्रिमूर्ती टॉकीज परिसरातील शॉपिंग सेंटरमध्ये उद्भवलेल्या विविध समस्यांची दखल

### बांधकाम सभापती ज्ञानेश्वर तेली यांची सुट्टीच्या दिवशीही मैदानात उतरुन पाहणी



सांगोला : सांगोला शहरातील त्रिमूर्ती टॉकीज परिसरातील शॉपिंग सेंटरमध्ये उद्भवलेल्या विविध समस्यांची दखल घेत बांधकाम सभापती तथा नगरसेवक ज्ञानेश्वर उर्फ माऊली तेली यांनी शनिवारी सुट्टीच्या दिवशी देखील प्रत्यक्ष भेट देत पाहणी केली.

यावेळी त्यांनी परिसरातील नागरिक व व्यापाऱ्यांशी संवाद साधत पाणीपुरवठा, स्वच्छता, गटारींची दुरुस्ती तसेच इतर मूलभूत सुविधांबाबतच्या अडचणी जाणून घेतल्या. नागरिकांनी मांडलेल्या समस्यांची तात्काळ दखल घेत संबंधित बाबींबाबत मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांना माहिती देण्यात आली. माहिती मिळताच मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची सविस्तर पाहणी केली व आवश्यक त्या सूचना दिल्या. सुट्टीचा दिवस असतानाही संपूर्ण नगरपालिका यंत्रणा तत्परतेने कामाला लागल्याचे यावेळी पाहायला मिळाले.

या पाहणीवेळी सांगोला नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा तथा नूतन नगरसेविका राणीताई माने, माजी नगरसेवक सतीश सावंत, संजय दौंडे , इंजि.सौरभ दौंडे तसेच नगरपालिका अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या परिसरातील समस्या तातडीने मार्गी लावण्यात येतील, अशी ग्वाही प्रशासनाकडून देण्यात आली.

प्रशासनाने त्वरित दखल घेतल्याबद्दल परिसरातील नागरिकांकडून समाधान व्यक्त केले.

## सिलिंग जमीन खरेदी-विक्री; आर्थिक फायद्यासाठी शासनाने घालून दिलेल्या,अटी व शर्तीचा केला भंग शासनास मिळणाऱ्या लाखो रुपयाचे नुकसान करुन,अनेक नागरिकांची फसवणूक

### तत्कालीन तलाठी पुरुषोत्तम पुजारी व मंडळ अधिकारी नवले यांच्यावर,शासकीय दफ्तरात खाडाखोड केल्याने फौजदारी गुन्हा दाखल करण्याची उमेश मंडले यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

सांगोला : सांगोला ता.सांगोला जि.सोलापूर येथील सिलिंग जमीन सर्वे नंबर ३७४/२अ क्षेत्र २ हे १० आर हि जमीन श्री. मधुकर नामदेव सावंत यांना दि.१८/१०/१९७७ रोजीचे फेरफार नंबर ७९५४ अन्वये वाटप करण्यात आली होती.सदर जमीन राजकुमार संदीपान जाधव यांना विक्री करण्यासाठी परवानगी मिळावी म्हणून श्री. मधुकर नामदेव सावंत यांनी जिल्हाधिकारी सोलापूर यांच्याकडे अर्ज दाखल केला होता. सदर श्री. मधुकर नामदेव सावंत यांच्या अर्जानुसार,सदर जमिनीची ५०% अनर्जित रक्कम भरून घेवुन, जमीन खरेदी घेणार श्री. राजकुमार संदीपान जाधव यांना,सदरची जमीन शेती प्रयोजनासाठी (कृषी कारणासाठी) नवीन शर्तीवर खरेदी करण्यास खालील अटी व शर्तीवर परवानगी देण्यात आली होती.

अटी व शर्ती

१) उक्त जमिनीची विक्री शेती प्रयोजनासाठीच (कृषी करण्यासाठी )करावी.

२) उक्त जमिनीची ५०% अनर्जित रक्कम रु.९,३१,०५०/- खरेदी-विक्री व्यवहारापोटी शासकीय खजिन्यात त्वरित भरणा करावी. त्यानंतरच उक्त जमिनीचा खरेदी-विक्री व्यवहार करावा.

३) उक्त जमीन श्री राजकुमार संदीपान जाधव यांनाच विक्री करावी. नियोजित खरेदीदार यांनी जमिनीचा वापर शेती प्रयोजनासाठी (कृषी कारणासाठी) नवीन शर्तीने करावा.


४) शेती व्यतिरिक्त वापरास बिनशेती दराने बाजारभावाचे ७५% रक्कम भरण्यास पात्र असा शेरा ७/१२ ला इतर हक्कात २ हेक्टर १० आर क्षेत्रात ठेवावा. व शेती व्यतिरिक्त वापरास सक्षम अधिकाऱ्याची परवानगी घेण्याची आहे.

५.उक्त जमिनीची खरेदी-विक्री व्यवहार सदर आदेशाच्या दिनांक पासून १ महिन्याच्या आत करावा.

६) उक्त जमिनीचे या आदेशानंतरचे कोणतेही हस्तांतरण किंवा विभागणी, ही सुद्धा महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम१९६१ चे कलम २९ व त्याची नियमावली १९७५ मधील नियम १२ (ड-१) व त्याखालील उपकलमाचे उपबंधाचे अधिन असेल.

७) वरील पैकी कोणत्याही अटीचा भंग झालेस अगर प्रस्तावातील माहिती खोटी असल्याचे नंतर आढळून आल्यास या आदेशान्वये दिलेली परवानगी कोणतीही नुकसान भरपाई न देता रद्द समजण्यात येईल व सदरची जमीन कायद्यांतर्गत तरतुदीनुसार सरकार जमा करण्यात येईल.

अशाप्रकारे सदर जमीन खरेदी घेणार श्री. राजकुमार संदीपान जाधव यांना १ ते ७ अटी व शर्ती घालून सदर सिलिंग जमीन खरेदीची परवानगी देण्यात आली होती.परंतु श्री राजकुमार संदिपान जाधव यांनी तात्कालीन गाव कामगार तलाठी पुरुषोत्तम पुजारी सांगोला व तात्कालीन मंडळअधिकारी श्री. नवले सांगोला, यांच्याशी संगणमत करून, सदर खरेदी केलेल्या सिलिंग जमिनीची ७/१२ पत्रकी अंमल घेतलेल्या फेरफार नंबर ३६२८९ मध्ये अधिकाराचा गैरवापर करून तात्कालिन गाव कामगार तलाठी पुरुषोत्तम पुजारी यांनी फेरफार मध्ये खाडाखोड करून, जमीन स.नं.३७४/२अ च्या हस्तलिखित ७/१२ उता-याच्या इतर हक्कात ''तबदील व सहकारी संस्थे शिवाय गहाण देणेची नाही''. हा शेरा बेकायदेशीर रित्या खाडाखोड,करून कंसकरुन कमी केला.व फेरफार नंबर ३६२८९ हा खरेदी नोंदी चा फेरफार असताना सदर फेरफार मध्ये खाडाखोड करून,''तसेच तबदील व सहकारी संस्थे शिवाय गहाण देणेची नाही''हे वाक्य फेरफार मध्ये बेकायदेशीररित्या वाढवलेले, सदर फेरफार तात्कालीन मंडळ अधिकारी यांनी बेकायदेशीर रित्या मंजूर केला मंजूर केला आहे.सदर सिलिंग जमीन खरेदी दस्त नंबर १६४७/२०१२ च्या पान ११ वर नमूद असलेल्या अटी व शर्ती मधील नं ४ नुसार ७/१२ उता-यावर इतर हक्कात नोंद घेणे अपेक्षित होते परंतु तत्कालीन गाव कामगार तलाठी व मंडळ अधिकारी सांगोला यांनी श्री.राजकुमार संदीपान जाधव यांचेशी संगणमत करून, अटी व शर्ती मधील नं ४ नुसार नोंद सातबारा उताऱ्यावर जाणीवपूर्वक घेतली नाही.व जमीन सर्वे नंबर ३७४/२अ च्या ७/१२ उता-यावर इतर हक्कात, ''तबदील व सहकारी संस्थे शिवाय गहाण देणेची नाही ''.असणारा



शेराही, जाणीवपूर्वक आपल्या कार्यालयीन कर्तव्यात कसूर करून, तत्कालीन मंडळ अधिकारी व गाव कामगार तलाठी सांगोला यांनी कंस करुन कमी केला आहे. जमिनी खरेदी घेणार श्री.राजकुमार संदिपान जाधव यांना,सदर सिलिंग जमीन सर्वे नंबर ३७४ /२अ क्षेत्र २ हेक्टर १० आर हि जमीन खरेदी करण्यासाठी जिल्हाधिकारी सोलापूर यांचे कडून देण्यात आलेल्या, क्रमांक सिलिग/ एसआर/६३/२०११ दि.०९/०४/२०१२ रोजीचे आदेशामध्ये घालून दिलेल्या सर्व अटी व शर्तींची कल्पना/ माहिती असतानाही, जाणीवपूर्वक स्वतः च्या आर्थिक फायद्यासाठी शासनाने घालून दिलेल्या,अटी व शर्तीचा भंग केला आहे. व शासनाची आणि नागरिकांची मोठी आर्थिक फसवणूक करून, स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी तत्कालीन गाव कामगार तलाठी व मंडळ अधिकारी सांगोला यांच्याशी संगणमत करून, शासनास मिळणाऱ्या लाखो रुपयाचे नुकसान करून,अनेक नागरिकांची फसवणूक करून , लाखो रुपयाचा आर्थिक फायदा करून घेतला आहे. त्यामुळे सदर प्रकरणाची तातडीने चौकशी करून तत्कालीन गाव कामगार तलाठी पुरुषोत्तम पुजारी व मंडळ अधिकारी श्री. नवले सांगोला यांच्यावर,शासकीय दफ्तरात खाडाखोड कले बाबत. फौजदारी गुन्हा दाखल करून, जिल्हाधिकारी सोलापूर यांचे कडून देण्यात आलेल्या, क्रमांक सिलिंग/ एसआर/६३/२०११ दि.०९/०४/२०१२ रोजीचे आदेशामध्ये घालून दिलेल्या अटी व शर्तींचा भंग केल्यामुळे सदर जमीन सरकार जमा करण्यात यावी, अशी मागणी श्री.उमेश मंडले सचिव जय मल्हार क्रांती संघटना महाराष्ट्र राज्य.यांनी केली आहे.

# मुक्त विचार

## विचारधन



माणूस नश्वर आहे, त्याचप्रमाणे विचार देखील नश्वर आहेत. एखाद्या कल्पनेचा प्रसार आवश्यक आहे, जसे की एखाद्या झाडाला पाणी देणे, अन्यथा कोमेजणे आणि मरणे दोन्ही.

-डॉ.बाबासाहेब आंबेडकर

## मराठी भाषा दिन – इतिहास, कुसुमाग्रज आणि साहित्याचा समृद्ध वारसा

महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक आणि भाषिक अस्मितेचा अत्यंत महत्त्वपूर्ण उत्सव म्हणजे 'मराठी भाषा गौरव दिन'. दरवर्षी २७ फेब्रुवारी रोजी हा दिवस केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर जगभरातील मराठी भाषिकांकडून अत्यंत उत्साहात साजरा केला जातो. हा दिवस ज्ञानपीठ पुरस्कार विजेते श्रेष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर, ज्यांना आपण 'कुसुमाग्रज' या टोपणनावाने ओळखतो, यांच्या जयंतीनिमित्त साजरा केला जातो. मराठी साहित्यातील त्यांचे अतुलनीय योगदान आणि मराठी भाषेच्या समृद्धीसाठी त्यांनी आयुष्यभर केलेले कार्य यांचा गौरव करणे, हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. हा संशोधन अहवाल मराठी भाषेचा इतिहास, कुसुमाग्रजांचे जीवनकार्य, भाषेला मिळालेला अभिजात दर्जा आणि आधुनिक युगातील मराठीचे स्थान यावर सखोल प्रकाश टाकतो.मराठी भाषा गौरव दिन का साजरा करतो?

मराठी भाषा गौरव दिनाचे महत्त्व आणि पार्श्वभूमी : मराठी साहित्याच्या क्षेत्रात कुसुमाग्रजांचे स्थान एखाद्या दीपस्तंभासारखे आहे. १० मार्च १९९९ रोजी त्यांच्या निधनानंतर, त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी आणि त्यांच्या साहित्यिक वारशाचा गौरव करण्यासाठी त्यांचा जन्मदिवस अधिकृतपणे साजरा करण्याची मागणी होत होती. २१ जानेवारी २०१३ रोजी महाराष्ट्र शासनाने यासंदर्भात ऐतिहासिक शासन निर्णय (जीआर) निर्गमित केला आणि २७ फेब्रुवारी हा दिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून घोषित केला.

मराठी माणसाच्या जीवनात या दिवसाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. हा केवळ एक दिनविशेष नसून, तो मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि विकासासाठी स्वतःला वाहून घेण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. मराठी साहित्यातील समृद्धता, तिचे सौंदर्य आणि भाषिक विविधता नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे हे या दिनाचे एक प्रमुख उद्दिष्ट आहे. अनेकदा लोकांमध्ये 'मराठी राजभाषा दिन' आणि 'मराठी भाषा गौरव दिन' या दोन दिवसांबाबत गोंधळ निर्माण होतो. परंतु, हे दोन्ही दिवस स्वतंत्र आहेत आणि त्यांचे महत्त्वही वेगळे आहे. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली, त्यानिमित्ताने १ मे हा दिवस 'मराठी राजभाषा दिन' म्हणून साजरा केला जातो, तर २७ फेब्रुवारी हा दिवस साहित्याच्या गौरवासाठी कुसुमाग्रजांच्या जयंतीनिमित्त समर्पित आहे.

कुसुमाग्रजांच्या साहित्यातील दीपस्तंभ : कुसुमाग्रजांचे साहित्य हे मानवी भावनांचे, क्रांतीचे आणि सामाजिक न्यायाचे प्रतिबिंब आहे. त्यांनी सलग चार दशकांहून अधिक काळ मराठी साहित्याची सेवा केली. त्यांच्या साहित्याने केवळ रसिक वाचकांनाच नाही, तर स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या सैनिकांनाही प्रेरणा दिली.त्यांच्या साहित्यातील योगदानाबद्दल त्यांना १९८७ मध्ये साहित्यातील सर्वोच्च मानला जाणारा 'ज्ञानपीठ पुरस्कार' प्रदान करण्यात आला. वि. स. खांडेकर यांच्यानंतर हा बहुमान मिळवणारे ते दुसरे मराठी साहित्यिक होते. भारत सरकारने त्यांना १९९१ मध्ये 'पद्मभूषण' पुरस्काराने सन्मानित केले.

मराठी भाषेचा ऐतिहासिक प्रवास: प्राचीन ते आधुनिक मराठी भाषेचा उगम आणि तिचा विकास हा अत्यंत रंजक आणि गौरवशाली प्रवास आहे. मराठी ही इंडो-आर्यन भाषाकुळातील एक प्राचीन भाषा असून तिचा इतिहास सुमारे १,५०० ते २,००० वर्षांचा आहे. ही भाषा पूर्ववैदिक, वैदिक, संस्कृत, पाली, प्राकृत आणि अपभ्रंश या टप्प्यातून उत्क्रांत होत आजच्या स्वरूपात पोहोचली आहे.मराठी भाषेतील सर्वात प्राचीन लेखी पुरावा कर्नाटक राज्यातील श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वराच्या पुतळ्याच्या पायथ्याशी आढळतो. तेथील शिलालेखावर श्रीचामुंडराजें करवियले असे कोरलेले आहे, जे अंदाजे इसवी सन ९८३ मधील आहे. परंतु, अलीकडील संशोधनानुसार, मराठीचा उगम त्याही आधी ५ व्या शतकात झाला असण्याचे संकेत मिळतात. मराठी साहित्याचा आरंभीचा काळ हा प्रामुख्याने धार्मिक आणि आध्यात्मिक साहित्याचा होता.

१. यादव काळ (आरंभीचा कालखंड): यादवांच्या काळात मराठीला राजभाषेचा दर्जा मिळाला, ज्यामुळे ग्रंथनिर्मितीला चालना मिळाली. मुकुंदराज यांनी ११९० मध्ये 'विवेकसिंधू' हा ग्रंथ लिहिला, जो मराठीतील पहिला ग्रंथ मानला जातो. संत ज्ञानेश्वरांनी भगवद्गीतेवर आधारित 'ज्ञानेश्वरी' (भावार्थ दीपिका) लिहून संस्कृतमधील ज्ञान मराठीत आणले आणि भाषेचा गोडवा अमृतापेक्षाही श्रेष्ठ असल्याचे सिद्ध केले.

२. मध्ययुगीन आणि भक्ती काळ: या काळात संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम आणि समर्थ रामदास यांसारख्या संतांनी आपल्या अभंगांतून आणि ओव्यांतून मराठी भाषा घराघरात पोहोचवली. त्यांनी सामाजिक विषमतेवर प्रहार केला आणि मराठी भाषेला लोकभाषेचे स्वरूप दिले.

३. शिवकाळ आणि पेशवे काळ: छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठीला स्वराज्याची राजभाषा बनवण्यासाठी 'राज्यव्यवहार कोश' तयार करून घेतला, ज्यामुळे प्रशासनातून फारसी शब्दांचा प्रभाव कमी होऊन मराठी शब्द रूढ झाले. पेशवे काळात शाहिरी वाङ्मय, पोवाडे आणि लावणीच्या माध्यमातून वीरश्री आणि मनोरंजन साहित्यात आले.

४. ब्रिटिश काळ आणि आधुनिक युग: १९ व्या शतकात छापखान्याचा शोध आणि पाश्चात्य शिक्षणाच्या प्रभावामुळे मराठी साहित्यात कादंबरी, नाटक आणि लघुकथा यांसारखे नवीन प्रकार रूढ झाले. बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' हे पहिले मराठी वृत्तपत्र सुरू करून पत्रकारितेचा पाया रचला.

मराठी भाषेला मिळालेला 'अभिजात' दर्जा : मराठी भाषेच्या इतिहासातील ३ ऑक्टोबर २०२४ हा दिवस सुवर्णाक्षरांनी लिहिला गेला आहे. या दिवशी केंद्र सरकारने मराठी भाषेला 'अभिजात भाषेचा दर्जा' देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. अनेक वर्षांपासून मराठी साहित्यिक, संशोधक आणि महाराष्ट्र सरकार या दर्जासाठी पाठपुरावा करत होते.अभिजात दर्जा मिळण्यासाठी काही कडक निकष केंद्र सरकारने निश्चित केलेले आहेत. त्यामध्ये भाषेचा इतिहास १,५०० ते २,००० वर्षे जुना असणे, भाषेचे स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व असणे आणि प्राचीन साहित्याचा वारसा असणे आवश्यक असते. मराठी भाषेने हे सर्व निकष यशस्वीपणे पार केले आहेत.

## तुकाराम मुंडे निवडणूक आयोगाचे अध्यक्ष झाले तर लोकशाहीचा खरा कस लागेल!

भारतीय लोकशाही ही केवळ मतपेटीपुरती मर्यादित नसून ती मूल्यांवर उभी असलेली व्यवस्था आहे, असे आपण अभिमानाने सांगतो. मात्र वास्तवात हीच लोकशाही आज अनेक प्रश्नांनी ग्रासलेली दिसते. निवडणुका म्हणजे लोकशाहीचा उत्सव मानला जातो, पण अलीकडच्या काळात हा उत्सव कमी आणि तमाशा अधिक झाला आहे. पैशांची उधळण, जाती-धर्माचे ध्रुवीकरण, सत्तेचा गैरवापर, प्रशासनावरचा दबाव आणि आचारसंहितेची खुलेआम पायमल्ली, हे सगळे जणू निवडणूक प्रक्रियेचे अविभाज्य घटक बनले आहेत. अशा परिस्थितीत एक प्रश्न प्रकर्षाने उपस्थित होतो. जर, तुकाराम मुंडे यांच्यासारखा निर्भीड, कणखर आणि नियमप्रिय अधिकारी भारताच्या निवडणूक आयोगाचा अध्यक्ष (मुख्य निवडणूक आयुक्त) झाला, तर नेमके काय बदलेल?

नियम म्हणजे सूचना नव्हे, तर ती बंधनकारक शिस्त होय. तुकाराम मुंडे यांचे संपूर्ण प्रशासकीय आयुष्य एका ठाम तत्त्वावर उभे आहे, नियम सर्वांसाठी समान. त्यांनी जिथे-जिथे काम केले, तिथे नियमांचे पालन हे ऐच्छिक नसून अनिवार्य असल्याचे ठामपणे बजावले. निवडणूक आयोगात हीच मानसिकता आली, तर आचारसंहिता ही फक्त नोटिसा आणि परिपत्रकांपुरती मर्यादित राहणार नाही. प्रचारसभांतील भडक भाषणे, धार्मिक-जातीय विद्वेष पसरवणारी वक्तव्ये, सरकारी यंत्रणेचा प्रचारासाठी वापर, या सगळ्यांवर 'तक्रार आली तर पाहू' ऐवजी तत्काळ आणि कठोर कारवाई होईल. मोठा नेता असो वा छोटा कार्यकर्ता, सत्ताधारी असोत वा विरोधक, सर्वांसाठी एकच मापदंड लागू होईल. राजकीय दबावांची साखळी तुटेल.

आज निवडणूक प्रक्रियेतील सर्वात मोठा धोका म्हणजे राजकीय हस्तक्षेप. 'वरून फोन आला', 'साहेब नाराज होतील', 'सरकारची इच्छा आहे' अशा वाक्यांनी अनेक निर्णय प्रभावित होतात. तुकाराम मुंडे यांची ओळखच अशी आहे की त्यांनी अशा दबावांना नेहमीच नकार दिला. त्यांनी स्पष्टपणे दाखवून दिले की प्रशासकाचे पहिले निष्ठास्थान हे राजकीय नेत्यांकडे नसून संविधानाकडे असते. ते निवडणूक आयोगाचे अध्यक्ष झाले, तर आयोगाचा संदेश स्पष्ट असेल फोनवर नव्हे, तर कायद्याच्या चौकटीत निर्णय होतील. यामुळे निवडणूक आयोगाची स्वायत्तता केवळ घटनात्मक तरतुदींपुरती न राहता प्रत्यक्षात अनुभवास येईल. पैशाच्या जोरावरची निवडणूक संस्कृती हादरेल. भारतीय निवडणुकांचे आजचे वास्तव म्हणजे पैसा. कोट्यवधी रुपयांचा खर्च, जाहिरातींचा मारा, सोशल मीडियावर प्रायोजित मोहिमा, मतदारांना अप्रत्यक्ष लाभ, या सगळ्यांनी निवडणूक म्हणजे श्रीमंतांचा खेळ असल्याची भावना निर्माण केली आहे. तुकाराम मुंडे यांच्यासारखा अधिकारी आयोगाच्या प्रमुखपदी आला, तर खर्चाच्या मर्यादा केवळ कागदावर राहणार नाहीत. बेकायदेशीर खर्च आढळला, तर केवळ दंड नव्हे तर उमेदवारी रद्द करण्यासारखी कठोर पावले उचलली जाऊ शकतात. यामुळे 'पैसा नव्हे, विचार महत्त्वाचा' हा संदेश ठळकपणे पोहोचेल. प्रशासकीय यंत्रणेला आत्मविश्वास मिळेल.

निवडणुकीदरम्यान सर्वाधिक ताण कोणावर असेल, तर तो मतदान अधिकारी, पोलीस, तहसीलदार आणि जिल्हाधिकाऱ्यांवर असतो. राजकीय दबाव आणि कायदेशीर जबाबदारी यामध्ये ते अनेकदा कात्रीत सापडतात. मुंडे अध्यक्ष असतील, तर प्रामाणिक अधिकाऱ्यांना स्पष्ट संदेश मिळेल, 'आयोग तुमच्या पाठीशी उभा आहे'. नियम पाळणाऱ्या अधिकाऱ्यांना संरक्षण आणि पाठबळ मिळेल, तर दबावाखाली निर्णय घेणाऱ्यांवर कारवाई होईल. यामुळे प्रशासकीय यंत्रणेत आत्मविश्वास निर्माण होईल आणि निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक बनेल. लोकशाही अधिक शिस्तबद्ध पण अस्वस्थ करणारी

हेही तितकेच खरे आहे की अशी शिस्तबद्ध लोकशाही अनेकांना अस्वस्थ करेल. नियम मोडून सत्तेची चढाओढ करणाऱ्यांना, भावनिक मुद्द्यांवर मतं गोळा करणाऱ्यांना आणि पैशाच्या जोरावर निवडणूक जिंकणाऱ्यांना ही व्यवस्था 'कटू' वाटेल. तुकाराम मुंडे यांच्यावर याआधीही 'अडेलतट्टू', 'कठोर', 'लोकप्रिय नसलेले' असे आरोप झाले आहेत. पण प्रश्न असा आहे की, लोकप्रियता महत्त्वाची की प्रामाणिकपणा? लोकशाही ही नेहमीच सोयीची असते का, की ती कधी-कधी अस्वस्थ करणारी असायलाच हवी?

मतदारांचा विश्वास पुनर्स्थापित होईल. आजचा सामान्य मतदार अनेकदा म्हणतो 'मत दिलं तरी काय फरक पडतो?' ही भावना लोकशाहीसाठी सर्वात घातक आहे. जर निवडणूक आयोग कठोर, पारदर्शक आणि निर्भीड झाला, तर हाच मतदार पुन्हा विश्वासाने मतदान केंद्राकडे वळेल. निवडणूक प्रक्रियेवरचा विश्वास वाढला, तर लोकशाहीचा पाया मजबूत होईल. तुकाराम मुंडे यांच्यासारखा अध्यक्ष हा विश्वास पुनर्स्थापित करू शकतो.

जर तुकाराम मुंडे निवडणूक आयोगाचे अध्यक्ष झाले, तर निवडणुका उत्सव राहतील, पण तमाशा राहणार नाही. सत्ता मिळवण्याचा मार्ग अधिक कठीण होईल, पण तो अधिक स्वच्छ आणि पारदर्शक बनेल. लोकशाही कदाचित कमी सोयीची वाटेल, पण ती अधिक प्रामाणिक आणि मजबूत होईल. खरा प्रश्न एवढाच आहे की, आपल्याला सोयीची लोकशाही हवी आहे की शिस्तबद्ध लोकशाही? जर उत्तर दुसरे असेल, तर तुकाराम मुंडे यांच्यासारख्या अधिकाऱ्यांचे नेतृत्व ही काळाची गरज ठरू शकते.

**-प्रवीण बागडे,नागपूर**

साप्ताहिक माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४३ वे अंक-१८ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# थकीत मालमत्ता करावरील शास्ती माफ करण्यासाठी थकीत मालमत्ता कर अभय योजनेस मंजुरी

## सांगोला नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत ५३ कामांना मंजुरी, शहराच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प





सांगोला: नगरपरिषद क्षेत्रातील मालमत्ता करावरील शास्ती माफ करुन वसुलीला प्रोत्साहन मिळणेच्या दृष्टीने अभय योजना राबविणे बाबत शासनाने काही कार्यपध्दती निश्चित केल्या होत्या.त्या अनुषंगाने सांगोला नगरपरिषदेने थकीत मालमत्ता करावरील शास्ती माफ करुन कर वसुल करण्यासाठी प्रोत्साहन मिळण्याच्या दृष्टीने अभय योजना लागु करण्यासाठी एकत्रित मालमत्ता करावरील शास्ती ५० टक्के माफ करुन अभय योजना राबविण्यास सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरी देण्यात आली असून तसा प्रस्ताव जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे कार्यालयाकडे मान्यता मिळण्यासाठी पाठविण्यात येणार असल्याची माहिती नगराध्यक्ष आनंदा (भाऊ) माने यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सांगोला नगरपरिषद यांची सर्वसाधारण सभा व पत्रकार परिषद सोमवार, दि. २३ फेब्रुवारी रोजी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृहात संपन्न झाली होती. या सर्वसाधारण सभेत ५३ कामांना मंजुरी देण्यात आली असून सर्वसाधारण सभेतील कामकाजाची माहिती सांगण्यासाठी पत्रकार परिषद आयोजीत करण्यात आली होती. या पत्रकार परिषदेप्रसंगी नगराध्यक्ष आनंदा माने, उपनगराध्यक्ष नितीन इंगवले, माऊली तेली, अरुण पाटील, काशिलिंग गावडे यांच्यासह नगरसेवक व अधिकारी उपस्थित होते.

मा.आमदार शहाजीबापू पाटील यांनी सन २०२४-२५ चया अर्थसंकल्पात सांगोला शहरासाठी २० कोटी रुपयांची तरतूद केली होती. यामधून शहरातील विविध विकास कामे मार्गी लावण्यात येणार आहेत. नगरपरिषद निवडणुकीचया कालावधीत मा.आ.शहाजीबापू पाटील यांनी दिलेल्या आश्वासनांनुसार स्व. भाई देशमुख स्मारकाच्या विषयास तहसील कार्यालय परिसरासाठी मंजुरी देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे विविध समाजाच्या समाजमंदिर उभारणीस मान्यता देण्यात आली आहे. लोणार, मातंग, नरवीर उमाजी नाईक रामोशी समाज , सोनार, चर्मकार, हटकर, शिंपी, यलमार,जैन, होलार, ब्राह्मण, महर्षी वाल्मिकी कोळी ,तसेच महाराणा प्रताप राजपूत गिसाडी समाजासाठी मंदिर बांधकामास मंजुरी देण्यात आली.तसेच माळी समाजाकरिता महात्मा फुले स्मृतीभवन (सभामंडप) बांधणे, त्याचप्रमाणे ऊर्जा बचत आणि पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने शहरात एलईडी पथदिवे खरेदी व बसविणे तसेच नगरपरिषद मालकीच्या कार्यालयीन इमारतीवर सौरऊर्जा प्रकल्प उभारणे या कामांनाही मंजुरी देण्यात आली आहे. यामुळे वीज खर्चात बचत होऊन नगरपरिषदेच्या उत्पन्नात दीर्घकालीन फायदा होणार आहे.

नागरिकांसाठी विरंगुळा, हरित क्षेत्र वाढविण्याच्या उद्देशाने व शहराच्या सौंदर्यीकरणासाठी वैशिष्ट्यपूर्ण 'नमो उद्यान' प्रकल्पासाठी १ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून प्रभाग क्रमांक ८ मध्ये २२ गुंठे जागा प्रस्तावित करण्यात आली आहे.छत्रपती शिवाजी महाराज चौकात १६०८ क्रमांकाच्या जागेवर तालीम व शिवसृष्टी मंदिर विकसित करण्यासाठी २ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला.ऊर्जा बचत आणि पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने शहरात एलईडी पथदिवे खरेदी व बसविणे तसेच नगरपरिषद मालकीच्या कार्यालयीन इमारतीवर सौरऊर्जा प्रकल्प उभारणे या कामांनाही मंजुरी देण्यात आली आहे. वासुद रोडवरील पाण्याच्या टाकी जवळ नागरिकांच्या आरोग्यवर्धनासाठी योग केंद्र विकसीत करणे कामास मंजुरी देण्यात आली.

शहरातील एखतपूर रोड वरील १६३ क्रमांकाच्या गार्डनला 'राजे उमाजी राजे नाईक उद्यान' असे नाव देण्यास तसेच भाजी मंडईलाही राजे उमाजी नाईक भाजी मंडई नाव देण्यास मान्यता देण्यात आली. अंबिका देवी मंदिर परिसराच्या सुशोभिकरणालाही मंजुरी देण्यात आली आहे.मोकाट जनावरांचा प्रश्न सोडवण्यासाठी बाहेरील गोशाळांशी संपर्क साधून जावरे तिथे सोडण्याचा निर्णय घेण्यात आला. नगरपरिषदेच्या विधी पॅनलवर ॲड. सुधीर वाघ यांची नेमणूक करण्यासही मंजुरी देण्यात आली आहे.अयोध्या नगरीतील सभागृहाला मा.आ. शहाजीबापू पाटील यांचे नाव देण्याचा विषयही मंजूर करण्यात आला असल्याची माहिती नगरसेवक अरुण पाटील यांनी दिली. पाच वर्षांत विरोधी पक्षातील सदस्यांनाही सोबत घेऊन शहराचा सर्वांगीण विकास करण्याचा निर्धार आम्ही केला आहे.

सर्वसाधारण सभेत सर्वसामान्य नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने ५३ विविध कामांना मंजुरी देण्यात आली आहे. सांगोला शहर धुळमुक्त करण्यासाठी १९ रस्त्यांची कामे लवकरच सुरु करण्यात येणार आहेत.त्याचप्रमाणे भुयारी गटार योजनेच्या पहिला टप्प्याची कामे सुरू असून सुमारे ७० टक्के प्रॉपर्टी चेंबरचे काम पूर्ण झाले असून भुयारी गटारीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी निधी उपलब्ध करून कामाला गती दिली जाणार आहे ,असे श्री.आनंदा माने,लोकनियुक्त नगराध्यक्ष,सांगोला नगरपरिषद यांनी सांगितले.

शहराच्या विकासासाठी विविध महत्त्वाच्या कामांना मंजुरी दिली आहे. दिव्यांग बांधव भवन, विविध समाजांसाठी समाजमंदिर, मोकाट जनावरे बंदोबस्त, एलईडी पथदिवे खरेदी, नगरपरिषद इमारतीवर सौरऊर्जा प्रकल्प, योगा केंद्र तसेच नमो उद्यान विकसित करण्याचे निर्णय घेण्यात आले.या कामांच्या मंजुरीमुळे शहरातील पायाभूत सुविधा, पर्यावरण संवर्धन आणि नागरिकांच्या सोयी-सुविधांमध्ये वाढ होणार असून या कामांमुळे शहरातील पायाभूत सुविधा, पर्यावरण संवर्धन आणि नागरिकांच्या सोयी-सुविधांमध्ये वाढ होणार आहे,असे उपनगराध्यक्ष श्री.नितीन इंगवले यांनी सांगितले.

## फॅबटेक मध्ये मराठी भाषा गौरव दिनानिमित्त भव्य ग्रंथ दिंडी

सांगोला : मराठी भाषा गौरव दिनानिमित्त फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च सांगोला महाविद्यालयात शुक्रवार दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी फॅबटेक टेक्निकल कॅम्पस आणि महाविद्यालयातील मध्यवर्ती ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर यांच्या हस्ते कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी डॉ. संजय आदाटे, इंजिनिअरिंग उपप्राचार्या डॉ. विद्याराणी क्षीरसागर, पॉलिटेक्निकचे प्राचार्य तानाजी बुरूंगले आदींसह फार्मसीचे ग्रंथपाल प्रा. प्रकाश गाडेकर सह विद्यार्थी उपस्थित होते. ग्रंथदिंडीच्या अग्रभागी फॅबटेक महाविद्यालयाचा चित्ररथ होता. सुमारे २० हून अधिक विद्यार्थ्यांचा पारंपरिक वेशभूषेत या ग्रंथ दिंडीत सहभाग होता.

या दिंडी सोहळ्यात स्पीकर्स द्वारे मराठी भाषेचे गीत लावण्यात आल्याने दिंडीत चैतन्य निर्माण झाले होते. झेंडा व पारंपरिक पोशाख आणि विद्यार्थ्यांच्या लाठीकाठीच्या प्रत्यक्षिकांनी लक्ष वेधले. मराठी भाषा, ग्रंथ यांची महती सांगणारे घोषवाक्याचे फलक हाती घेत तर काही विद्यार्थिनींनी ज्ञानेश्वरी, दासबोध आदी ग्रंथ डोक्यावर घेत मराठीचा जागर केला. महाविद्यालयातील पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, फार्मसी कॉलेज, पॉलिटेक्निक कॉलेज आणि इंजिनिअरिंग कॉलेज आदी ठिकाणी जाऊन मराठी भाषेची जनजागृती करण्यात आली. या दिंडीत महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारीवर्ग, ग्रंथप्रेमी वाचक आणि विद्यार्थी यात सहभागी झाले होते. मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने एक प्रेरणादायी उपक्रम फॅबटेक मध्ये राबविण्यात आला. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती रुजावी हा यामागचा मुख्य उद्देश होता. मराठी ही केवळ भाषा नसून ती आपल्या अस्मितेची, संस्कृतीची आणि परंपरेची ओळख असल्याची भावना यादरम्यान व्यक्त झाली. हा दिंडी सोहळा यशस्वी करण्यासाठी ग्रंथपाल मोहन लिगाडे, स्वप्नील रूपनर, नेताजी मस्के, दत्तात्रय शिंदे, विद्यार्थी आर्यन कोळी, साहिल वलेकरआदींसह महाविद्यालयातील पदविका विभागातील प्रथम वर्ष मधील अनेक विद्यार्थी, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## अंबिकादेवी वाचनालयात मराठी भाषा दिन व सावरकर आत्मसर्पण दिन साजरा

सांगोला : दिनांक २७ फेब्रुवारी रोजी वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीनिमित्त अंबिकादेवी वाचनालय सांगोला येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व साहित्य क्षेत्रात त्यांनी दिलेल्या मोलाच्या योगदानाचा गौरव म्हणून शासनाने त्यांच्या जयंतीस मराठी भाषा गौरव दिन असा मान दिला आहे. मराठी भाषा ज्ञानभाषा म्हणून विकसित व्हावी यासाठी कुसुमाग्रजांनी आयुष्यभर अथक परिश्रम घेतले. मातृभाषेचा सन्मान, जतन व संवर्धन तसेच तिचा व्यापक प्रचार व्हावा या उद्देशाने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच सावरकर आत्मसर्पण दिनानिमित्त शासन परिपत्रकानुसार स्वातंत्र्यवीर सावरकर प्रतिमा पूजन करण्यात आले त्यांचे योगदानाचे महत्व विशद करण्यात आले. या प्रसंगी वाचनालयाचे पदाधिकारी, कर्मचारी व वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते आणि कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सूत्रसंचालन सचिव अशोक व्हटे ,आणि आभार ग्रंथपाल अमर कुलकर्णी यांनी मानले.

### तक्ता ४ (नियम ८ अन्वये)

### साप्ताहिक माणदेश वार्ता या वृत्तपत्राची मालकी व अन्य तपशील याबाबतचे निवेदन खालीलप्रमाणे

| | |
|---|---|
| १)प्रकाशकाचे नांव | :सोनवणे रोहित मारूती |
| २)राष्ट्रीयत्व | :भारतीय |
| ३)प्रकाशन स्थळ | :१२७९ अ, भारत गल्ली, सांगोला,जि. सोलापूर |
| ४)मुद्रक | :माळी अशोक बाळकृष्ण |
| ५)प्रकाशनाचे स्वरूप | :साप्ताहिक |
| ६)राष्ट्रीयत्व | :भारतीय |
| ७)मुद्रण स्थळ | :बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स, नेहरू चौक, सांगोला |
| ८)मालक व संपादक | :सोनवणे रोहित मारूती |
| ९)राष्ट्रीयत्व | :भारतीय |
| १०)पत्ता | :१२७९ अ, भारत गल्ली, सांगोला,जि. सोलापूर |

मी सोनवणे रोहित मारूती याव्दारे असे जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या समजुतीप्रमाणे खरी व बरोबर आहे.

दिनांक १ मार्च २०२६

प्रकाशकाची सही

(सोनवणे रोहित मारूती)

# सांगोला नगरपरिषद हद्दीत एखतपूर रोड भागाकरिता पाण्याची उंच नवीन टाकी बांधणे व पाणीपुरवठा करण्यासाठी रायझिंग मेन टाकणे ठराव जनरल मीटिंगमध्ये एकमताने मंजूर

सांगोला : सांगोला शहरातील एखतपूर रोड परिसरात पाणीपुरवठ्याच्या सोयीसाठी नगरपरिषदेने १९९८ साली पाण्याची उंच टाकी बांधलेली आहे. या टाकीची क्षमता २ लाख लिटर असून या टाकीतून पुजारवाडी, नविन वसाहत, मस्के कॉलनी, बापू झंझे वसाहत, बनकर वस्ती, धोंडीराम जाधव वस्ती व धर्मा जाधववस्ती करीता पाणीपुरवठा करणेत येत आहे. सदर भागात नवीन वसाहतीचे प्रमाण वाढले आहे. सदर भागातील सध्या अस्तीत्वातील लोकसंख्येचा विचार करता नागरीकांना पाणीपुरवठा करण्यास अडचणी निर्माण होत आहेत व पाणी कमी प्रमाणात मिळत आहे. काही भाग पाण्यापासून वंचित आहे, याची दखल घेत लोकनियुक्त नगराध्यक्ष आनंदाभाऊ माने, पाणीपुरवठा सभापती सौ. वैशाली सतीश सावंत, प्रभाग क्रमांक ६ च्या नगरसेविका व महिला बालकल्याण समितीच्या उपसभापती सौ. सीमा समाधान सरगर तसेच नगरसेवक चैतन्य ज्ञानु राऊत यांनी नगरपालिकेच्या जनरल मीटिंगमध्ये या संदर्भात एकमताने ठराव मंजूर करून एखतपूर रोड भागाकरिता पाण्याची उंच नवीन टाकी बांधणे व टाकीस पाणीपुरवठा करण्यासाठी जलशुध्दीकरण केंद्रापासून पाण्याच्या टाकीपर्यंत रायझिंग मेन टाकण्याचा ठराव मंजूर केला आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून सदर कामाचे अंदाजपत्रक व प्रस्ताव / डीपीआर तयार करून घेणे, कामाचा विषय मा. सर्वसाधारण सभेत सर्वानुमते मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे एखतपूर रोड परिसरातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची सोय होणार आहे.

# विजयलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमनपदी विजय राऊत तर व्हा. चेअरमन पदी नवनाथ फुले

सांगोला : विजयलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी श्री.विजय कुंडलिक राऊत तर व्हा चेअरमन पदी नवनाथ तुकाराम फुले यांची बिनविरोध निवड झाली. संस्थेच्या कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी श्री अमर गोसावी (सहा. निबंधक सहकारी संस्था) यांच्या अध्यक्षतेखाली नुतन संचालक मंडळाची व चेअरमन व व्हा. चेअरमन पदाच्या निवडीसंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी चेअरमन पदासाठी श्री.विजय राऊत तर व्हा.चेअरमन पदासाठी श्री नवनाथ फुले यांचा प्रत्येकी एक अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली.



पतसंस्थेच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच पार पडली होती. यावेळी चेअरमन व व्हा चेअरमन व नुतन संचालक मंडळाचा सत्कार करण्यात आला. यावेळी संचालक म्हणून श्री शंकर फुले, पोपट राऊत, रामचंद्र राऊत, दिलीप राऊत, शितल राऊत, सतीश खडतरे, मल्लिकार्जुन लोहार, सौ सविता बनकर, सौ सविता नवले तसेच शिवतेज पतसंस्थेचे चेअरमन श्री.शिवाजी (नाना) बनकर व श्री सिद्धेश्वर नवले सर, तज्ञ संचालक भारत राऊत यांच्यासह सेक्रेटरी संतोष फुले, सेवक वर्ग आबासो राऊत, किशोर राऊत, अजित फुलारी, पूनम माळी, सिद्धी लिगाडे व रोहित नवले उपस्थित होते.

# कोल्हापूर-सांगली मार्गावरील एसटी बसेस एखतपूर रोडवरुन बंद करा; नगरसेविका सीमाताई सरगर यांची परिवहन महामंडळाकडे मागणी

सांगोला : कोल्हापूर-सांगली मार्गावरील जाणाऱ्या व येणाऱ्या एसटी बसेस एखतपूर रोडवरुन सद्यस्थितीत बंद कराव्यात किंवा पर्यायी मार्गाने वळवाव्यात, अशी मागणी सांगोला नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या उपसभापती तथा नगरसेविका सीमाताई समाधान सरगर यांनी निवेदनाद्वारे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडे केली आहे. सदर विषयासंदर्भात नगरसेविका सीमाताई समाधान सरगर यांचेकडून काल गुरुवार दि.२६ फेब्रुवारी रोजी व्यवस्थापक, म.रा.परिवहन महामंडळ यांना देण्यात आले आहे. वंदे मातरम चौक ते एखतपूर ब्रिज या दरम्यान भुयारी गटारी योजनेचे काम सुरू असून सध्या वाहतूक एकेरी करण्यात आली आहे. अशा परिस्थितीत या मार्गावरून धावणाऱ्या जाणाऱ्या व येणाऱ्या एसटी बसेसचा वेग जास्त असल्याने रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धूळ उडत आहे. त्यामुळे पादचारी, सायकलस्वार तसेच मोटरसायकलस्वार नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या परिस्थितीत नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता असल्याने कोल्हापूर-सांगली मार्गावरील बसेस एखतपूर रोडवरुन तात्पुरत्या स्वरूपात बंद कराव्यात किंवा पर्यायी मार्गाने वळवाव्यात, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# सांगोला नगरपरिषद हद्दीत माळी समाजासाठी महात्मा फुले स्मृतीभवनाच्या कामास मंजुरी

सांगोला : सांगोला नगरपरिषद हद्दीत माळी समाजाकरिता नगरपरिषदेच्या मालकीच्या जागेमध्ये १ कोटी रुपये खर्चाच्या महात्मा फुले स्मृतीभवन (सभामंडप) बांधण्याच्या कामास मंजुरी देण्यात आली आहे. नुकत्याच पार पडलेल्या सांगोला नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत या विषयावर चर्चा होऊन सदर प्रस्तावास एकमताने मंजुरी देण्यात आली. माळी समाजासाठी सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रम राबविण्यासाठी स्वतंत्र सभामंडपाची दीर्घकालीन मागणी होती. त्या पार्श्वभूमीवर नगरपरिषदेच्या जागेत महात्मा फुले स्मृतीभवन उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी चैतन्य राऊत व समाज बांधवांनी मा.आ.शहाजीबापू पाटील यांचेकडे स्मृतीभवनासाठी मागणी केली होती. त्यानंतर नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये या प्रस्तावासाठी नगरसेवक चैतन्य राऊत यांनी पुढाकार घेत हा विषय सर्वसाधारण सभेत मंजूर झाला. स्मृतीभवनाच्या माध्यमातून समाजाला एक हक्काचे व्यासपीठ मिळणार असून, विविध सामाजिक उपक्रमांना चालना मिळणार आहे. या निर्णयामुळे माळी समाजामध्ये समाधान व्यक्त करण्यात येत असून, लवकरच प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते ग्रंथमित्र गुलाबराव पाटील यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार




सांगोला : ग्रंथालय चळवळीत गेल्या अनेक वर्षापासून काम करणाऱ्या सांगोला येथील ग्रंथमित्र गुलाबराव पाटील यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार नुकताच रत्नागिरी येथे महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ हिरक महोत्सवी अधिवेशनात प्रदान करण्यात आला. रत्नागिरी जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने दिला जाणारा मानाचा 'राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार' सांगोला येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि प्राथमिक शिक्षक ग्रंथमित्र गुलाबराव पाटील यांना नुकताच उपस्थित मान्यवर यांचे हस्ते शाल,मानपत्र ,शिल्ड रोख रक्कम ५००१ देण्यात आले. गुलाबराव पाटील यांच्या ग्रंथालय चळवळीतील प्रदीर्घ, निष्ठावंत आणि प्रेरणादायी कार्याची दखल घेऊन हा बहुमान त्यांना प्रदान करण्यात आला आहे.

श्री.पाटील यांनी प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत असताना समाजप्रबोधन, वाचनसंस्कृतीचा प्रसार आणि ज्ञानचळवळीच्या विस्तारासाठी स्वतःला पूर्णतः वाहून घेतले आहे. सांगोला तालुक्यातील मौजे आलेगांव येथील स्वामी विद्यानंद सार्वजनिक वाचनालयाचे ते संस्थापक अध्यक्ष म्हणून सन १९९४ पासून काम पाहत आहे. त्यांनी या ग्रंथालयाच्या उभारणीत आणि सर्वांगीण विकासात मोलाचे योगदान दिले आहे.

केवळ एका वाचनालयापुरते मर्यादित न राहता, त्यांनी सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघ, पुणे विभाग ग्रंथालय संघ आणि महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ या संघटनांमध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष , प्रमुखकार्यवाह कार्यवाह, संचालक व निमंत्रित सदस्य अशा विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडून ग्रंथालय चळवळीला व्यापक दिशा दिली आहे. याशिवाय सांगोला तालुका ग्रंथालय संघाचे ते संस्थापक अध्यक्ष आणि दीपकआबा सांळुखे-पाटील प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष म्हणूनही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे.रोटरी क्लब ,अखिल भारतीय सानेगुरुजी कथामाला ,विविध सामाजिक, शैक्षणिक व सेवाभावी संस्थांमध्ये सक्रिय सहभाग घेत त्यांनी समाजहिताचे कार्य सातत्याने केले आहे.

या पुरस्कार वितरण सोहळ्यास संजय सरगर , अमर कुलकर्णी, बिरुदेव काळे, मच्छिंद्र लेंडवे, अनिल कुलकर्णी ,औदुंबर काळे, शिवाजी नागणे ,सिध्दार्थ खरात, प्रथमेश बनसोडे ,सारिका माडीकर , वृशाली हजारे ,छाया मोरे ,अमृता कुलकर्णी ,वृशाली काळे ,रमेश कोकरे ,अनंत ढोले सह महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ ,कोकण विभाग ग्रंथालय संघ सोलापूर जिल्हा ग्रंथालय संघ सांगोला तालुका ग्रंथालय संघ पदाधिकारी ,ग्रंथालय कार्यकर्ते सेवक आदी उपस्थित होते.

# श्रीराम नवमी उत्सवानिमित्त नव्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर अध्यक्षपदी ॲड.राहुल सरगर यांची तर उपाध्यक्षपदी प्रफुल्ल साळुंखे




सांगोला : सांगोला शहरात आगामी श्रीराम नवमी २०२६ उत्सवाच्या अध्यक्षपदी ॲड.राहुल सरगर यांची तर उपाध्यक्षपदी प्रफुल्ल साळुंखे यांची निवड करण्यात आली. नूतन पदाधिकारी निवडीसाठी सांगोला शहरात नुकतीच बैठक संपन्न झाली.

यावेळी नूतन पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर करण्यात आल्या. उत्सवाच्या खजिनदारपदी श्री. शेखर चाळशी, सचिवपदी श्री. भैय्या पवार, कार्याध्यक्षपदी श्री.दिपक खटकाळे तसेच सहसचिवपदी श्री. राजेंद्र चव्हाण यांची निवड करण्यात आली आहे.

नवीन पदाधिकाऱ्यांनी श्रीराम नवमी उत्सव भक्तीमय व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्याचा संकल्प व्यक्त केला. उत्सवाच्या यशस्वितेसाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत.

निर्भिड व सडेतोड बातम्यांसाठी
नियमित वाचा....
साप्ताहिक माणदेश वार्ता